
सकाळ कोल्हापूर, शनिवार, १ सप्टेंबर २०१८

# विवेकानंद कॉलेजमध्ये रक्तदान शिबिर

**कोल्हापूर, ता. ३१ :** विवेकानंद कॉलेजमध्ये शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने रक्तदान शिबिर झाले. कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे उपस्थित होते. छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयाने रक्तसंकलनासाठी सहकार्य केले.

सकाळ

कोल्हापूर, शुक्रवार,
३ ऑगस्ट २०१८ | २



कोल्हापूर : उद्‍घाटन प्रसंगी बोलताना डॉ. बी. एम. हिर्डेकर सोबत डावीकडून प्रा. एस. पी. पाटील, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, सुनील पाटील, प्रा. बी. के. गावित, प्रा. पी. आर. बागडे आदी.

# 'विवेकानंद'मध्ये एनएसएसचे उद्‍घाटन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना उद्‍घाटन व गुरुपौर्णिमेचे आयोजन केले होते. या वेळी संजय घोडावत विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेने राबवलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. या वेळी वसगडेचे माजी सरपंच सुनील पाटील, प्रा. डॉ. मंजुश्री घोरपडे, डॉ. एस. डी. शिंदे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । गुरुवार, ४ ऑक्टोबर २०१८

# म.गांधी, लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन

## जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम

**विवेकानंद महाविद्यालय :** 'राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी संपूर्ण जगाला सत्य, अहिंसा व सत्याग्रहाचे तत्वज्ञान दिले' असे प्रतिपादन विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाच्यावतीने महात्मा गांधीजी जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यार्थी वैभव खोत व अनिकेत पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. इतिहास विभागप्रमुख डॉ. मंजुश्री घोरपडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. एस. आर. कट्टीमनी, एन. एस. एस., एन. सी. सी. व भूगोल विभागाच्यावतीने महाविद्यालयीन परिसराची स्वच्छता करण्यात आली.

पुढारी | गुरुवार ४ ऑक्टोबर २०१८

# शाहूपुरी पोलिस ठाण्यात स्वच्छता

विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना व भूगोल मंडळाच्या विद्यार्थ्यांनी गांधी जयंतीचे औचित्य साधून शाहूपुरी पोलिस ठाण्यात स्वच्छता केली. परिसरातील कचरा, प्लास्टिक बाटल्या गोळा करण्यात आल्या. पोलिस ठाण्याच्या वतीनेही विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्रा. एच. पी. पाटील, साहाय्यक फौजदार विलास गेंजगे, सागर डोंगरे, राम तळपे, भांगरे उपस्थित होते..

तरुण भारत
गुरुवार, ४ ऑक्टोबर २०१८

## विवेकानंद महाविद्यालय

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर म्हणाले गांधीवादी विचारसरणीची जगाला गरज असल्याचे सांगितले. यावेळी इतिहास विभागप्रमुख डॉ. मंजुश्री घोरपडे, डॉ. एस. आर. कट्टीमनी, विद्यार्थी वैभव खोत, अनिकेत पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राध्यापक, एन. सी. सी. व एन. एस. एस.चे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

पुढारी

# 'विवेकानंद'मध्ये रक्तदान शिबिर

कोल्हापूर ( प्रतिनिधी ) : विवेकानंद महाविद्यालयात शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्रसेना यांच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. प्रास्ताविक प्रा.डॉ. एस. जी. गावडे यांनी केले. प्रा. संदीप पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्रा. एच. पी. पाटील, प्रा. सुनीता भोसले, डॉ. मंजूश्री घोरपडे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर
शुक्रवार, ५ ऑक्टोबर २०१८

# महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन

कोल्हापूर टाइम्स टीम



राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

पुरुष हक्क संरक्षण समितीच्यावतीने पापाची तिकटी येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. पुरुष हक्क समितीचे जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब कोकितकर, जिल्हा सचिव मुस्ताक अजीज मुल्ला, किशोर देसाई, इम्रान मोमीन, इक्बाल तांबोळी, रवी माने उपस्थित होते.

आर. के. वालावलकर प्रशालेत महात्मा गांधी व लालबहादूरशास्त्री जयंतीनिमित्त वर्गांची सजावट करण्यात आली. तसेच शालेय परिसर स्वच्छ करण्यात आला. मुख्याध्यापिका प्रेरणा जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी निबंध स्पर्धेत ऋतुजा कारंडे, रौबीन कदम यांनी यश मिळवले. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेचे उद्घाटन नगरसेविका अश्विनी बारामते यांच्या हस्ते झाले.

यावेळी अरुण बारामते, सुधाकर सावंत, उमेश देसाई, विजय माळी, उषा सरदेसाई, अशोक जाधव, एस.के. यादव उपस्थित होते. विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महात्मा गांधी जयंतीनिमित्त शाहूपुरी पोलिस स्टेशन परिसरात स्वच्छता करण्यात आली. पोलिस कर्मचाऱ्यांनी गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. कार्यक्रम संयोजन अधिकारी प्रा. एच. पी. पाटील, प्रा. पी. आर. बागडे, डॉ. मंजुश्री घोरपडे आदी उपस्थित होते.

श्रीमती आनंदीबाई सरदेसाई हायस्कूल तसेच अवनि संस्थेमध्येही महात्मा गांधी यांना अभिवादन करण्यात आले.

पुण्य नगरी

शनिवार, ६ ऑक्टोबर २०१८



कोल्हापूर : शाहूपुरी पोलीस ठाणे परिसरात स्वच्छता मोहिमेत सहभागी विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक.

# 'विवेकानंद'तर्फे स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भूगोल मंडळाच्या वतीने स्वच्छता हीच सेवा या केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत शाहूपुरी पोलीस स्टेशन परिसरात महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

सुरुवातीला पोलिसांनी स्वयंसेवकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. त्याचबरोबर चहापानाचीही व्यवस्था केली. त्यामुळे सर्व स्वयंसेवक भारावून गेले. हे सर्व नियोजन राहुल वाघमारे, ठाणे अंमलदार गेंजगे, कॉन्स्टेबल बांगिरे, तळपे यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील, प्रा. पी. आर. बागडे, डॉ. मंजुश्री घोरपडे, प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. जी. एस. उबाळे, प्रा. बी. के. गावीत उपस्थित होते.

तरुण भारत
शनिवार, ६ ऑक्टोबर २०१८

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांच्याकडून पोलीस ठाण्याची स्वच्छता

**कोल्हापूर :** येथील शाहुपूरी पोलिस ठाण्याच्या परिसराची महात्मा गांधीजींच्या जयंतीचे औचित्य साधून विवेकानंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व भूगोल मंडळाच्या वतीने स्वच्छता करण्यात आली. विद्यार्थ्यांनी परिसरातील कचरा, प्लॅस्टिक बाटल्या आदी गोळा केल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.वाय.होनगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.एच.पी.पाटील, प्रा.पी.आर.बागडे, डॉ. मनुश्री घोरपडे, प्रा. वाय.डी. हरताळे, प्रा. जी.एस.उबाळे, प्रा.बी.के.गावीत आदीनी नियोजन केले होते.

सकाळ, ०४.०१.२०१८

# विवेकानंद कॉलेजतर्फे शिबिर

सांगवडेवाडी, ता. ७ : एनएसएसमुळे युवकांची समाजाशी नाळ जुळते, असे मत प्राचार्य डॉ. एम. वाय. होनगेकर यांनी व्यक्त केले. वसगडे येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात ते बोलत होते. गेली १० वर्षे वसगडेत विवेकानंद कॉलेजतर्फे शिबिर आयोजित केले जाते. अध्यक्षस्थानी सरपंच नेमगोंडा पाटील होते. ते म्हणाले, संस्कार-संस्कृती जपण्याचे कार्य या शिबिरातून व्हावे. या वेळी पं. स. सदस्या शोभा राजमाने, उपसरपंच संदीप कामत, सुनील पाटील, बाळासाहेब उपाध्ये, डॉ. श्रीकांत चौगुले, पोलिसपाटील संजय पाटील, भुजगोंडा पाटील, ग्रामसेवक गिरी गोसावी उपस्थित होते. प्रा. बी. एस. लाड यांनी प्रास्ताविक, प्रा. डॉ. व्ही. सी. महाजन यांनी स्वागत, तर प्रा. संदीप पाटील यांनी आभार मानले.

पुढारी
दि. ०९.०१.२०१८

# सकारात्मक दृष्टिकोनासह आनंदी जगा : भोईटे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माणसाला जीवन सहजसुंदर व सुखी करायचे असेल तर त्यास आनंदी जीवनाची गुरुकिल्ली समजली पाहिजे. आयुष्यात अनेक संघर्ष करावे लागतात. हे सुख दुःखाचे प्रसंग माणसाच्या जीवनघडणीचे पैलू पाडत असतात. यामुळे आपले जगणे आनंदी होईल असे जगा, असे प्रतिपादन कवी अशोक भोईटे यांनी केले.

ते विवेकानंद कॉलेजतर्फे वसगडे येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये 'सांगा कसं जगायचं' या विषयावर बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. डी. बी पाटील, प्रा. एस. ए. पाटील, प्रकल्पाधिकारी डॉ. व्ही. सी. महाजन, प्रा. बी. एस. लाड, प्रा. संदीप पाटील आदी उपस्थित होते.

**दंतचिकित्सा उपक्रम**

दरम्यान, या श्रमसंकार शिबिरात दंतचिकित्सा शिबिर झाले. यावेळी डॉ. प्रशांत लगाली यांनी दाताचे महत्त्व पटवून दिले. यावेळी ७५ विद्यार्थी व ग्रामस्थांनी डॉ. तृप्ती, तारकेश्वरी, तस्लीम, शीतल पाटील यांनी दंत तपासणी केली.

P

म. टाइम्स
10.01.2018

# 'ज्ञान-विज्ञानातूनच सामाजिक परिवर्तन'

कोल्हापूर : 'समाज परिवर्तन घडवायचे असेल तर ज्ञान, विज्ञानवादी झाले पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाल्याने त्यांचा खेड्यातील प्रत्यक्ष जीवनाशी संबंध येतो. त्यांना समाजजीवनातील संघर्ष, समस्या, चांगल्या वाईट गोष्टींचे ज्ञान होते. या शिबिराच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी आणि संस्काराचे धडे दिले जातात,' असे मत विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी व्यक्त केले.

वसगडे येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. या शिबिरात दैनंदिन उपक्रमामध्ये ग्रामस्वच्छता, आरोग्य शिबिर, वृक्षसंवर्धन, एड्स जनजागृती, जलसाक्षरता, महिला सबलीकरण, पर्यावरण जागृती, सांडपाणी व्यवस्थापन, प्रदूषण व पर्यावरण जनजागृती असे कार्यक्रम आयोजित केले आहेत. प्रास्ताविक प्रा. संदीप पाटील यांनी केले. बी. एस. लाड यांनी आभार मानले. सौरभ पाटील यांनी सूत्रसंचालन केले. MT

सकाळ, दि. 11.01.2018

# 'विवेकानंद'तर्फे वसगडेत व्याख्यान

सांगवडेवाडी, ता. १० : विवेकानंद महाविद्यालयातर्फे वसगडे येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात 'सांगा कसं जगायचं' यावर व्याख्यान झाले. कवी अशोक भोईटे यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री भोईटे म्हणाले, 'जीवनातील सुख-दुःखाचे, संघर्षाचे प्रसंग माणसाच्या जीवन घडणीचे पैलू असतात. यामुळे जगणे आनंदी होईल, असे जगा. इतरांच्या दुःखात सहभागी व्हा. सकारात्मक दृष्टीकोन ठेवल्यास जीवन आनंदी होईल.' प्रा. डॉ. डी. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रा. एस.एस. पाटील, प्रकल्प अधिकारी डॉ. व्ही. सी. महाजन, प्रा. बी.एस. लाड, प्रा. संदीप पाटील, प्रा. एस. डी. जोशी, प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. बी. पी. पालकर, प्रा. डॉ. एस. डी. शिंदे, ग्रामस्थ, स्वयंसेवक उपस्थित होते.

पुढारी
शुक्रवार
१४ सप्टेंबर २०१८

# स्वच्छ भारताच्या उभारणीत युवकांचे योगदान : प्राचार्य शानेदिवाण

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** कोणतीही गोष्ट यशस्वी करायची असेल तर युवकांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळेच स्वच्छ भारताच्या उभारणीत युवकांचे योगदान ही मोलाचे असल्याचे मत प्राचार्य आर. के. शानेदिवाण यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेजमध्ये अग्रणी महाविद्यालय योजनेर्तंगत राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी डॉ. मधुकर बाचुळकर, प्राचार्य डॉ. एस. वाय. होणगेकर आदींनी मार्गदर्शन केले.

पुढारी | बुधवार १८ जुलै २०१८

# विवेकानंद महाविद्यालयातर्फे वसगडे येथे वृक्षारोपण

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** विवेकानंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे शासनाच्या वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत वसगडे (ता. करवीर) येथे १५० झाडे लावण्यात आली. प्राचार्य डॉ.एस. वाय. व्होनगेकर, सरपंच नेमगोंडा पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपसरपंच संदीप कामत, सुनील पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. संदीप पाटील व स्वयंसेवक उपस्थित होते.

लोकमत 18.7.2018

# विवेकानंद कॉलेजतर्फे वसंगडे येथे वृक्षारोपण

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने शासनाच्या वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत वसगडे (ता. करवीर) येथे १५० रोपे लावण्यात आली. कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, सरपंच नेमगोंडा पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण केले. याप्रसंगी त्यांनी दुष्काळावर मात करायची असेल तर झाडे लावणे ही काळाची गरज आहे. असा संदेश देण्यात आला. याप्रसंगी वसगडे गावचे उपसरपंच संदीप कामत, सुनील पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. संदीप पाटील, प्रा. डॉ. एस. डी. शिंदे, प्रा. डॉ. एम. एस. घोरपडे, प्रा. वाय. हरताळे, शंभर स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

तरुण भारत
मंगळवार, १८ सप्टेंबर २०१८

# कसबा बावडा परिसरात मूर्तिदानला प्रतिसाद

**कसबा बावडा :** 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या गजरात कसबा बावडा परिसरात गणरायाला निरोप देण्यात आला. यावेळी विविध संघटना, संस्था यांच्यावतीने करण्यात आलेल्या मूर्तीदान आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नगरसेवक डॉ. संदीप नेजदार फौंडेशन, (कै) यशवंतराव भाऊराव पाटील विद्यानिकेतन, विवेकानंद कॉलेज (राष्ट्रीय सेवा योजना), पालिकेच्यावतीने मूर्तीदान, निर्माल्यदान उपक्रमासाठी कार्यकर्ते झटत होते. पंचगंगा नदीपात्राची पाणीपातळी कमी असल्याने गणेशभक्तांनी मोकळ्या जागेत आरती करून मूर्ती दान केल्या. निर्माल्य पाण्यात विसर्जित करु नये, असे आवाहन पालिकेच्यावतीने करण्यात येत होते. त्याला प्रतिसाद देत महिलांनी निर्माल्य कुंडामध्ये दान केले. गौरी गीताने घाट परिसर गुंजून गेला होता. मार्गावर भक्तांना प्रसाद वाटप, दूधवाटप करण्यात येत होते.

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, १९ जुलै २०१८ | ३

ले. सहायक शिक्षक सौ.
शिक्षक उपस्थित होते.

## वसगडेमध्ये वृक्षारोपण

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे वृक्षलागवड झाली. वसगडे (ता. करवीर) येथील १५० झाडांची लागवड केली. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, सरपंच नेमगोंडा पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. उपसरपंच संदीप कामत, सुनील पाटील, सदस्या सौ. कांबळे उपस्थित होते. प्रा. एच. पी. पाटील, प्रा. पी. आर. बागडे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । गुरुवार, २० सप्टेंबर २०१८

# मूर्तीदानास प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने राबवलेल्या मूर्तीदान उपक्रमास नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. घरगुती गौरी-गणपती विसर्जनाच्या निमित्ताने कसबा बावडा येथील राजाराम बंधारा घाटावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मूर्ती आणि निर्माल्य दान करण्याचे आवाहन केले. नागरिकांनी शेकडो मूर्तींचे दान केले. या उपक्रमामुळे पंचगंगा नदीचे प्रदूषण टाळण्यास मोठी मदत झाली. प्रा. संदीप पाटील, प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. बी. के. गावित उपस्थित होते.

सकाळ Today
कोल्हापूर, शुक्रवार,
२१ सप्टेंबर २०१८

# 'विवेकानंद'तर्फे मूर्तिदानाला प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे गणेश मूर्तिदान, निर्माल्य गोळा करणे हा उपक्रम राबविला. घरगुती गौरी-गणपती विसर्जनानिमित्त कसबा बावडा येथील राजाराम बंधारा नजीकच्या घाटावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी या उपक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थी स्वयंसेवकांनी नागरिकांना गणेश मूर्तिदान, निर्माल्य दान करण्याबाबत आवाहन केले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. उपक्रमात प्रा. संदीप पाटील, प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. पी. आर. बागडे आदी उपस्थित होते. S

पुढारी | शुक्रवार
२१ सप्टेंबर २०१८

# 'एनएसएस'च्या विद्यार्थ्यांचा सलग १८ वर्षे मूर्ती दान उपक्रमात सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी सलग १८ वर्षे मूर्ती दान व निर्माल्य गोळा करून प्रदूषणविरहीत पंचगंगा हा उपक्रम राबवला. कसबा बावडा येथील राजाराम बंधाऱ्यानजीकच्या घाटावर हा उपक्रम राबवण्यात आला. यंदाच्या उपक्रमास नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. या उपक्रमात प्रा. संदीप पाटील, प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. पी. आर. बगाडे, प्रा. बी. के. गावीत आदींसह विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग होता.

लोकमत कोल्हापूर, शुक्रवार, दि. २१ सप्टेंबर २०१८




कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयामध्ये 'स्वच्छ भारताच्या उभारणीत युवकांचे योगदान' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी मार्गदर्शन केले. शेजारी प्रा. एच. पी. पाटील, डॉ. मधुकर बाचुळकर, प्रा. संदीप पाटील, आदी उपस्थित होते.

# सामाजिक प्रश्नांना भिडण्यासाठी एन. एस. एस.

## शानेदिवाण : 'विवेकानंद'मध्ये कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राष्ट्रीय सेवा योजनेतून स्वयंसेवकांमध्ये अविरत सेवाभावी वृत्ती निर्माण करण्यासाठी प्रेरणा निर्माण होते. जे काही सामाजिक प्रश्न आहेत, त्यांच्या मुळाशी जाण्याची व समाजाच्या वेदना जाणून घेण्याची प्रगल्भता 'एन.एस.एस.'मुळे येते, असे प्रतिपादन शहाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयामध्ये अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'स्वच्छ भारताच्या उभारणीत युवकांचे योगदान' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. मधुकर बाचूळकर होते.

डॉ. शानेदिवाण म्हणाले, आज देशात जे काही प्रश्न आहेत, त्यांच्या सोडवणुकीसाठी एन. एस. एस.च्या स्वयंसेवकांना आवाहन केले जात आहे. आज देशात स्वच्छतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. एन. एस. एस.मुळे स्वत:मध्ये बदल करण्याचा विचार सुरू होतो. विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे कार्यशाळेचे आयोजन केले होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. कार्यक्रमास प्रा. पी. आर. बागडे, प्रा. डॉ. मंजूश्री घोरपडे, प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. डॉ. के. पी. शिंदे व एन. एस. एस., आदी उपस्थित होते.

तरुण भारत

रविवार, २२ जुलै २०१८

# विवेकानंद कॉलेजतर्फे वसगडेत वृक्षारोपण

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वसगडे येथे वृक्षारोपण करण्यात आले. येथे १५० वृक्षांची लागवड करण्यात आली. सरपंच नेमगोंडा पाटील, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा. एच. पी. पाटील, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. संदीप पाटील, डॉ. एस. डी. शिंदे, डॉ. एम. एस. घोरपडे उपस्थित होते. T

म. टाइम्स
दि. 23.07.2018

# 'विवेकानंद'तर्फे वृक्षारोपण

**कोल्हापूर:** येथील विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने राज्य सरकारच्या वृक्षलागवड मोहिमेतंर्गत वसगडे येथे १५० रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, वसगडेचे सरपंच नेमगोंडा पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपसरपंच संदीप कामत, सुनील पाटील, एच, पी. पाटील, पी. आर. बागडे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते. MT

तरुण भारत ▪ मंगळवार, २५ सप्टेंबर २०१८

# विवेकानंदच्या निर्माल्य दान उपक्रमला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या पर्यावरणपूरक गणपती विसर्जनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कसबा बावडा येथील राजाराम बंधारा घाटावर मोठ्या प्रमाणात गणेशमूर्ती व निर्माल्य दान केले. यामुळे प्रदूषण विरहित पंचगंगा उपक्रम यशस्वी झाला. या उपक्रमात प्रा. संदीप पाटील, प्रा. पी.आर. बागडे, प्रा. बी. के. गावीत सहभागी झाले होते.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । गुरुवार, २७ सप्टेंबर २०१८

# 'नवनिर्मितीक्षम विद्यार्थी घडावा'

**कोल्हापूर :** 'नव्या शिक्षण पद्धतीतून नवनिर्मितीक्षम विद्यार्थी घडावा' अशी अपेक्षा संजय घोडावत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी व्यक्त केली.

प्राध्यापक प्रबोधिनीच्यावतीने ब्लूम्स टॉक्सोनॉमी या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

डॉ. हिर्डेकर म्हणाले, 'आजचे शिक्षण पाठ्यक्रम, अध्यापन व शिक्षणातील कौशल्यावर आधारीत आहे. त्यामुळे परीक्षेचे स्वरुपही नवतंत्रज्ञानावर आधारीत असले पाहिजे. तंत्रज्ञान व संशोधन यातून आजची शिक्षणपद्धती समृद्ध झाली तरच विद्यार्थी वेगळा विचार करतील.'

कार्यक्रमात प्राचार्य डॉ. होनगेकर यांनी स्वागत केले. प्रा. एस. एन. रूईकर यांनी आभार मानले.

# राष्ट्रीय सेवायोजना दिनी कार्यक्रम

**कोल्हापूर :** 'तरूणांमध्ये स्वच्छता व श्रमदानाच्या महत्वातून सकारात्मक दृष्टिकोन जागृत करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना उपयुक्त आहे' असे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजना दिनी कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील होते. प्रा. पी. आर. बागडे यांनी स्वागत केले. वाय. डी. हरताळे यांनी आभार मानले. ओंकार कोळी, रूपाली मुसळे यांनी मनोगत व्यक्त केले.

# वादविवाद स्पर्धेत पाटील, जंगम प्रथम

**कोल्हापूर :** सांगोला येथे झालेल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या सौरभ पाटील व विवेक जंगम यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत पुणे, सातारा, लातूर, कोल्हापूर, मंगळवेढा या जिल्ह्यांतून विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये निवडण्यात आलेल्या चार सर्वोत्कृष्ट वक्त्यांमध्ये सौरभ पाटील याला द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांचे कॉलेजच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.

# संसदीय कामकाज परिसंवाद

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या राज्यशास्त्र विभागाच्यावतीने भारतीय संसदीय कामकाज या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.


संसदेत सभासदांचे वर्तन, कामकाजातील विलंब, अडथळे, कागदपत्रांमधील भाषा याविषयी चर्चा व मत व्यक्त करण्यात आले. संसदेच्या कामकाजाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता व उत्सुकता निर्माण व्हावी यासाठी या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार यांनी संयोजन केले. यावेळी प्रा. एस. डी. जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. समीक्षा फराकटे यांनी आभार मानले.

केसरी २८ ऑगस्ट २०१८

# विवेकानंद कॉलेजतर्फे बालसंकुल येथे रक्षाबंधन

कोल्हापूर : प्रतिनिधी

येथील विवेकानंद कॉलेजच्या एन.एस.एस. विभागाच्या वतने बालकल्याण संकुल येथे रक्षाबंधनाचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी संकुलातील मुलांना विवेकानंद कॉलेजच्या एन.एस.एस. च्या मुलींनी राख्या बांधल्या. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस.वाय. होनगेकर, प्रा. एच.पी. पाटील, प्रा. बगाडे, डॉ. मंजुश्री घोरपडे, प्रा. संदीप पाटील आदी उपस्थित होते.



बालसंकुल येथे रक्षाबंधन सोहळ्यानिमित्त उपस्थित विवेकानंद कॉलेज, एन.एस.एस. चे स्वयंसेवक.

सकाळ कोल्हापूर, बुधवार, २९ ऑगस्ट २०१८



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या एनएसएस विभागातर्फे बालकल्याण संकुल येथे रक्षाबंधन कार्यक्रम झाला. एनएसएसच्या मुलींनी मुलांना राख्या बांधल्या. प्रा. एस. पी. पाटील, प्रा. पी. आर. बागडे, डॉ. मंजूश्री घोरपडे, प्रा. संदीप पाटील उपस्थित होते.

लोकमत
www.lokmat.com
कोल्हापूर, सोमवार,
दि. ३० जुलै २०१८



विवेकानंद महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. बी. एम. हिर्डेकर. डावीकडून प्रा. एच. पी. पाटील, एस. वाय. होनगेकर, सुनील पाटील, प्रा. बी. के. गावित, प्रा. पी. आर. बागडे उपस्थित होते.

# देशधर्म मानतो तोच खरा स्वयंसेवक : हिर्डेकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : जो दुसऱ्याच्या आनंदामध्ये स्वतःचा आनंद मानतो, ज्याचा विवेक जागृत आहे आणि जो मानवधर्म, देशधर्म व ज्ञानधर्म मानतो, तोच खरा स्वयंसेवक होय, असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

यावेळी होनगेकर म्हणाले, काळानुसार महाविद्यालयीन युवकांसमोर नवनवीन आव्हाने येत आहेत. त्यांना समोरे जाण्याची ताकद राष्ट्रीय सेवा योजनेत आहे.

प्रा. एच. पी. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. पी. आर. बागडे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. प्रा. बी. के. गावित यांनी आभार मानले.

कार्यक्रमास वसगडेचे माजी सरपंच सुनील पाटील, प्रा. डॉ. मंजूश्री घोरपडे, डॉ. एम. डी. शिंदे, प्रा. नीती पाटील, प्रा. संदीप पाटील, प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. डॉ. डी. आर. तुपे, प्रा. एस. एस. काळे, प्रा. डॉ. एम. व्ही चरणकर, प्रा. यू. आर. हिरकुडे, प्रा. बी. पी. पालकर, आदी उपस्थित होते.

पुढारी
सोमवार
३० जुलै २०१८



संक्षिप्त



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना संजय घोडावत विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांच्यासह मान्यवर.

# मानवधर्म, देशधर्म मानणारा खरा स्वयंसेवक : डॉ. हिर्डेकर

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** राष्ट्रीय सेवा योजना ही सुसंस्कारासाठीच आहे. जो मानवधर्म, देशधर्म मानतो तोच खरा स्वयंसेवक असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) व गुरुपौर्णिमा समारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय.होनगेकर होते. डॉ. हिर्डेकर म्हणाले, एनएसएसमध्ये विद्यार्थांनी झोकून देऊन काम केले तर देशमहासत्ता होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एच. पी. पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. पी. आर. बागडे यांनी करून दिला. प्रा. बी. के. गावीत यांनी आभार मानले. यावेळी वसगडेचे माजी सरपंच सुनील पाटील, प्रा. डॉ. मंजुश्री घोरपडे, डॉ. एस. डी. शिंदे, प्रा. नीता पाटील आदी उपस्थित होते.

# विवेकानंद कॉलेजमध्ये रक्तदान शिबिर

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी राबवलेल्या या उपक्रमात अनेक रक्तदात्यांनी आपला सहभाग दिला. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. साळुंखे म्हणाले, 'सध्या समाजात विविध आरोग्य विषयक समस्यांमुळे रक्ताची गरज भासू लागली आहे. रक्त योग्य वेळी मिळाले तर रूग्णाचा जीव वाचू शकतो. त्यामुळे रक्तदानाविषयी जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. या हेतूने या उपक्रमाचे आयोजन स्तुत्य आहे. विद्यार्थीदशेत सामाजिक भान येणाऱ्या उपक्रमात सहभाग घेतल्यामुळे तरूणांमध्ये वैचारीक प्रगल्भता येते.' रक्तसंकलनासाठी छत्रपती प्रमिलाराजे रूग्णालयाच्यावतीने सहकार्य करण्यात आले. mt

तरुण भारत

# विवेकानंदतर्फे बालकल्याण संकुलमध्ये रक्षाबंधन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील एनएंसएस विभागातर्फे बालकल्याण संकुलमध्ये रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात पार पडला. विवेकानंदमधील मुलींनी बालसंकुलमधील मुलांना राख्या बांधून खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी प्रा. एच. पी. पाटील, प्रा. पी. आर. बागडे, डॉ. मंजुश्री घोरपडे, प्रा. संदीप पाटील यांच्यासह एनसीसीचे १०० विद्यार्थी उपस्थित होते. मराठी विभागाच्या वतीने अंधशाळेत सामाजिक बांधीलकी म्हणून रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानंतर येथील मुलांना फळे वाटप करण्यात आली. यावेळी प्रा. बी. के. गोसावी, डॉ. प्रदीप पाटील यांच्यासह बी. ए. भाग तीनची मुले व मुली उपस्थित होत्या.

महाराष्ट्र टाइम्स
कोल्हापूर मंगळवार, ३१ जुलै २०१८

# 'राष्ट्रीय सेवा योजनेतून होतात सुसंस्कार'

कोल्हापूर टाइम्स टीम

## विवेकानंद कॉलेज येथे डॉ. हिर्डेकर यांचे प्रतिपादन

'जो दुसऱ्याच्या आनंदात स्वतःचा आनंद मानतो. तसेच ज्याचा विवेक जागरुक आहे आणि जो मानवधर्म, ज्ञानधर्म मानतो तोच खरा स्वयंसेवक असतो. सेवा योजना सुसंस्कारासाठीच आहे,' असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले. विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन व गुरुपौर्णिमा समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

यावेळी बोलताना डॉ. हिर्डेकर म्हणाले, 'राष्ट्रीय सेवा योजनेत युवकांनी झोकून देऊन काम केले तर देश निश्चितच महासत्ता होऊ शकतो. राष्ट्रीय सेवा योजना केवळ गाव स्वच्छ करणारी यंत्रणा नसून नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणारी चैतन्यदायी चळवळ आहे. मनुष्य जगात असणाऱ्या सर्व प्रकारच्या साधनसंपत्तीचा वारेमाप उपभोग घेत आहे. त्याच्याकडून पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे. त्यासाठी युवकांकडून दत्तक घेतलेल्या गावात जलसाक्षरता मोहीम राबविता येऊ शकते.'

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. पी. एच. पाटील यांनी तर पाहुणे परिचय प्रा. पी. आर. बागडे यांनी केला. यावेळी वसगडे गावचे माजी सरपंच सुनील पाटील, प्रा. डॉ. मंजुश्री घोरपडे, प्रा. नीता पाटील आदी उपस्थित होते. आभार प्रा. बी. के. गावीत यांनी मानले.

तरुण भारत

# रक्तदान सर्वश्रेष्ठ जीवनदान : प्राचार्य अभयकुमार साळुंखे

कोल्हापूर : समाजामध्ये विविध आरोग्य विषयक कारणांनी रक्ताची गरज भासू लागली आहे. सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीयत्व जपण्यासाठी, बंधूभावाची प्रेरणा जागरूक करण्यासाठी रक्तदान करणे गरजेचे आहे. त्यामुळे रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे, असे मत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेज शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर डॉ. एस. जी. गावडे, प्रा. संदिप पाटील प्रा. एच. पी. पाटील, प्रा. सुनीता भोसले आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी



HighLights

# वसगडेत सेवा योजना शिबिर

**कोल्हापूर/ प्रतिनिधी :**

आजच्या शिक्षणातून नवी सामाजिक जाणीव निर्माण होत आहे, असे मत काकासाहेब चव्हाण कॉलेज येथील प्रभारी प्राचार्य डॉक्टर सतीश घाटगे यांनी व्यक्त केले. विवेकानंद महाविद्यालयाच्या वसगडे येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिर या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विवेकानंद महाविद्यालय मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक भाऊसाहेब गोसावी होते.

यावेळी हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्राध्यापक एच. पी. पाटील, प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. मंजुश्री घोरपडे, एनएसएस स्वयंसेवक व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. Pu,

सकाळ

कोल्हापूर, सोमवार,
३ डिसेंबर २०१८

# वसगडेत 'विवेकानंद'च्या शिबिराचा समारोप

**सांगवडेवाडी :** वसगडे येथे विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप झाला. शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा, मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे म्हणाले, "जीवन मूल्यांमुळे व्यक्तीला परिपूर्णता येते. आपल्या देशाला थोर संस्कृतीचा वारसा लाभला आहे." प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. पी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. सौरभ पाटीलने सूत्रसंचालन केले. सरपंच नेमगोंडा पाटील, उपसरचंप संदीप कामते आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । बुधवार, ५ डिसेंबर २०१८

# 'शिबिरांमुळे जीवनमूल्ये'

**कोल्हापूर :** 'राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून व्यक्तीला परिपूर्ण करणारी जीवनमूल्ये रुजविली जातात. जीवनमूल्यांमुळे व्यक्तीला परिपूर्णता लाभते. महाविद्यालयीन युवकांनी अशा शिबिरात सहभाग घ्यावा.' असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले. विवेकानंद कॉलेजतर्फे वसगडे येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभात ते बोलत होते. प्राचार्य एस. वाय. होनगेकर अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. सौरभ पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सरपंच नेमगोंडा पाटील, उपसरपंच संदीप कामत, रावसाहेब झोरे, जी. डी. गिरीगोसावी, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. वाय. डी. हरताळे आदी उपस्थित होते.

सकाळ
कोल्हापूर, शनिवार,
२० ऑक्टोबर २०१८

# 'क्लीन, ग्रीन कोल्हापूर'ला साथ द्या

## प्रतिमा पाटील यांचे आवाहन; अंबाबाई मंदिर स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर, ता. १९ :** प्रतिमा सतेज पाटील सोशल वेल्फेअर ऑर्गनायझेशनच्या वतीने आयोजित 'कोल्हापूर शहर क्लीन आणि ग्रीन' या उपक्रमाला साथ द्यावी, असे आवाहन अध्यक्षा सौ. प्रतिमा सतेज पाटील यांनी केले. अंबाबाई मंदिर स्वच्छता अभियानाप्रसंगी त्या बोलत होत्या. या मोहिमेचा प्रारंभ महापौर शोभा बोंद्रे, आमदार सतेज पाटील, उपमहापौर महेश सावंत, युवानेते ऋतुराज पाटील, आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत झाला.

यावेळी प्रतिमा पाटील म्हणाल्या, "स्वच्छता अभियानामध्ये घरोघरी जाऊन महिलांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देऊन, त्यांना किचन गार्डनसारखी संकल्पना विकसित करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. या अभियानाला विविध सेवाभावी संस्थांनी सहकार्य केले आहे. शहरवासीयांना सुविधा देण्यासाठी आमदार सतेज पाटील यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत."



**कोल्हापूर : अंबाबाई मंदिर परिसरात स्वच्छता करताना सतेज पाटील, ऋतुराज पाटील, शोभा बोंद्रे, प्रतिमा पाटील, अभिजित चौधरी व इतर.**

संस्थेमार्फत राबवत असलेल्या उपक्रमांना कोल्हापूरकारांनी साथ द्यावी, असे आवाहन प्रतिमा पाटील यांनी केले. कोल्हापूर प्रेस क्लब, इनरव्हील क्लब, ऑईस्टर जैन ग्रुप, क्रेडाई, मुक्ता, अवनी, एकटी संस्था, व्हाईट आर्मी, गार्डन्स क्लब, महापालिका आरोग्य कर्मचारी, अमिताभ फॅन्स क्लब, वर्ल्ड वाईड, दिलासा सामाजिक संस्था, रणरागिणी ग्रुप, बिझनेस ग्रुप, प्रतिमा सतेज पाटील महिला बचत गट, विवेकानंद कॉलेज माजी विद्यार्थी ग्रुप, शिवाजी विद्यापीठ एनएसएस ग्रुप राधानगरी यांच्यासह या अभियानात अनेक संस्थानी सहभाग नोंदवला.

> **आपलं कोल्हापूर, कसं स्वच्छ राहील यासाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे. शहरात ज्या ज्या ठिकाणी गरज आहे, त्या ठिकाणी स्वच्छता अभियान राबवून कोल्हापूर शहर स्वच्छ ठेवू.**
> **- प्रतिमा पाटील**

S

सकाळ कोल्हापूर, शुक्रवार, २३ नोव्हेंबर २०१८

# वसगडे येथील गाव तलावाचे रुपडे पालटले


## ग्रामपंचायतीसह विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान

**प्रकाश नलवडे** : सकाळ वृत्तसेवा

सांगवडेवाडी, ता. २२ : गावात तलाव असणे म्हणजे गावची शान समजली जाते. अशाच वसगडे (ता. करवीर) येथील गाव तलावाचे रूप पालटले ते विवेकानंद कॉलेज, ग्रामपंचायत, ग्रामस्थांच्या सहकार्यातून. येथे 'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेचे शूटिंग सुरू असून रोज सुमारे पाचशे पर्यटक भेट देतात. या तलावाजवळ छायाचित्र काढतात. सूर्य उगवताना व मावळताना तलावाचे दृश्य पाहण्यासारखे असते.

शासनाच्या मुनिजन योजनेअंतर्गत गाव दत्तक योजना अनुसरून विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामपंचायतीतर्फे येथे काम चालू आहे. ७० मुली, ८० मुले तलाव सुशोभीकरण, स्मशानभूमी, गावात स्वच्छता, व्याख्याने, पथनाट्य घेऊन आदर्श गाव करण्यासाठी झटत आहेत. यामध्ये त्यांनी पाण्यावर असणारी केंदाळ वनस्पती काढली. झाडाझुडपात बुजलेली विहीर स्वच्छ केली. या विहिरीवर जाळी टाकणे आवश्यक आहे. तलावाशेजारी बाजार कट्ट्यावर भरणारा बाजार संपल्यानंतर कचरा तलावात टाकण्यात येत होता. प्रा. संदीप पाटील यांनी त्याला पायबंद घातला. या तलावात निर्माल्य, गणेशमूर्ती विसर्जन केले जात नाही. सरपंचांसह सर्व सदस्य, कर्मचारी उपस्थित राहून तलाव स्वच्छतेसाठी प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांनी तलावाभोवती असणाऱ्या संरक्षण भिंतीवर 'लेक वाचवा, देश वाचवा', 'झाडे लावा, झाडे जगवा', असे अनेक संदेश लिहिले आहेत.

सुमारे १०० झाडे तलावाभोवती लावली आहेत. पूर्वी तलाव व विहिरीतील पाण्याचा पिण्यासाठी वापर होत होता. कालांतराने सांडपाणी मिसळत असल्याने पिण्यास पाणी वापरणे बंद झाले. तलावात मिसळणारे सांडपाणी ग्रामपंचायतीने सध्या बंद केले आहे. बागडी समाजही या तलावाच्या स्वच्छतेकडे लक्ष देत आहे. उपसरपंच संदीप कामत, सर्व पंच, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, अभयकुमार साळुंखे, शुभांगी गावडे, प्रा. एच. पी. पाटील, प्रा. बी. एस. लाड, प्रा. एस. डी. जोशी, प्रा. व्ही. सी. महाजन, एकनाथ मंगल, एस. पी. देसाई, राम बोंगे, दीडशे विद्यार्थी-विद्यार्थिनी गावाच्या सौंदर्यासाठी झटत आहेत.



**तलावाभोवती फिरण्यासाठी ट्रॅक, बसण्यासाठी बाक आणि बोटिंगसाठी प्रयत्न करणार आहे. रात्री तलावाचे सौंदर्य खुलवण्यासाठी लाईट व्यवस्था करण्याचा मानस आहे.**
**- नेमगोंडा पाटील**, सरपंच



**विद्यार्थी, ग्रामस्थांच्या सहकार्यामुळेच हे शक्य झाले. तलाव आणखी सुंदर करून वसगडेकडे पर्यटकांना आकर्षित करू.**
**- प्रा. संदीप पाटील**



**वसगडे : शीतल कमते यांनी ड्रोन कॅमेऱ्याच्या सहाय्याने टिपलेले गाव तलावाचे नयनरम्य दृश्य.**

### श्रमसंस्कार शिबिर

**येथे दहा दिवस श्रमसंस्कार शिबिर सुरू होत आहे. दीडशे विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सहभाग, गावातील तरुण मंडळी, संस्थांचाही त्यात सहभाग असेल. रोज व्याख्याने, स्वच्छता मोहीम, पथनाट्य, चर्चासत्र आदी कार्यक्रम होणार आहेत.**

पुण्य नगरी

सोमवार, २६ नोव्हेंबर २०१८

# वसगडे येथे श्रमसंस्कार शिबिरास प्रारंभ

**सांगवडे / प्रतिनिधी :**

मेहनतीने मनगट तर शिक्षणाने मन व मस्तक घडवायचे असते यासाठी कॉलेज वयातच श्रमसंस्काराची आवश्यता असते, असे प्रतिपादन प्राचार्या शुभांगी गावडे यांनी केले. वसगडे, ता. करवीर येथे स्वामी विवेकानंद कॉलेज व शिवाजी विद्यापीठ आयोजित राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन विद्यापीठाचे प्रकल्प संचालक प्रा. डी. के. गायकवाड होते.



**वसगडे येथे शिबिरात बोलताना प्राचार्या शुभांगी गावडे. सोबत प्रा गायकवाड, शोभा राजमाने, प्राचार्य होनगेकर, सरपंच नेमगोंडा पाटील, उपसरपंच संदीप कामत.**

विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, बाळासो उपाध्ये, प्रकाश नलवडे यांनी मनोगत व्यक्त केले. मान्यवरांचा कॉलेज व ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास प्रकल्प अधिकारी प्रा. एच. पी. पाटील, प्रा. बी. के. गाबित, पोलीस पाटील संजय पाटील, सरपंच नेमगोंडा पाटील, उपसरपंच संदीप कामत, सदस्य महावीर गवळी, माजी सरपंच सुनील पाटील, पं. स. सदस्या शोभा राजमाने, बाळासो उपाध्ये, सचिन पाटील, प्रा. संदीप पाटील, प्रा .बी. एस. लाड व शिबिरार्थी ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. एच. पी. पाटील यांनी तर सूत्रसंचलन सौरभ पाटील यांनी केले. प्रा. डॉ. एस. डी. शिंदे यांनी आभार मानले.

सकाळ
कोल्हापूर, मंगळवार,
२७ नोव्हेंबर २०१८

# वसगडेत विवेकानंद कॉलेजच्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्‌घाटन

**सांगवडेवाडी, ता. २६** : 'मेहनतीने मनगट व शिक्षणाने मन आणि मस्तक घडवायचे असते. यासाठी कॉलेज वयातच श्रमसंस्काराची आवश्यकता असते', असे मत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्य शुभांगी गावडे यांनी वसगडे (ता. करवीर) येथे व्यक्त केले.

त्या विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात उद्‌घाटनप्रसंगी बोलत होत्या. ग्रामीण जनतेच्या सान्निध्यात राहिल्याने रूढी-परंपरा, चाली-रीती, जाती-धर्मांच्या पंथांची, संस्कारांची ओळख या शिबिरातून होते, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्रकल्प संचालक प्रा. डी. के. गायकवाड यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर म्हणाले, ''करत असलेल्या कामातून चांगली ओळख निर्माण झाली पाहिजे.''

सरपंच नेमगोंडा पाटील, प्रा. एच. पी. पाटील, प्रा. बी. के. गावित, उपसरपंच संदीप कामत, पोलिसपाटील संजय पाटील, महावीर गवळी, सुनील पाटील, शोभा राजमाने, बाळासाहेब उपाध्ये, सचिन पाटील, प्रा. संदीप पाटील, प्रा. बी. एस. लाड, प्रदीप येवारे उपस्थित होते. प्रा. एच. पी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. डी. शिंदे यांनी आभार मानले. सौरभ पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । गुरुवार, २९ नोव्हेंबर २०१८

# 'अज्ञान आणि कर्मकांडाला मूठमाती द्या'

**कोल्हापूर :** 'ज्ञानसंपादनातून विचार, विवेक जागृत करून अज्ञान व कर्मकांडाला मूठमाती दिली पाहिजे. नवी समाज व्यवस्था उभारण्यात ही मानसिकता उपयुक्त ठरेल' असे प्रतिपादन तळमावले येथील काकासाहेब चव्हाण कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश घाटगे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजच्या वसगडेत सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विवेकानंद कॉलेजचे मराठी विभाग प्रमुख भाऊसाहेब गोसावी होते. डॉ. घाटगे म्हणाले, 'माणसाला विचारांनी जागृत करण्यासाठी शिक्षणापेक्षा प्रभावी पर्याय नाही. मात्र शिक्षणातून नोकरीच्या संधी व व्यवसायाची कवाडे खुली होणेही आवश्यक आहे. त्यासाठी तरूणांनी आपल्या क्षमतांना वाव देणाऱ्या करिअरची निवड केली पाहिजे.' यावेळी संविधानदिनाच्या औचित्याने प्रतिज्ञा घेण्यात आली. प्रा. एच. पी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. वाय. डी. हरताळे यांनी आभार मानले.

तरुण भारत
शुक्रवार, ३० नोव्हेंबर २०१८

# जीवन जगण्याची कला म्हणजेच 'एन. एस. एस' : डॉ. होनगेकर

**कोल्हापूर :** व्यक्तिमत्व विकासाबरोबर सामाजिक विकास करणे तसेच जीवन जगण्याची कला शिकणे म्हणजेच एन.एस. एस होय, असे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.वाय. होनगेकर यांनी केले. शारीरिक, बौद्धिक, मानसिक, भावनिक व नैतिक विकास होणे गरजेचे आहे. वसगडे येथील आयोजित विवेकानंद कॉलेजच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात व्यक्तिमत्त्व विकासासाठी एन. एस.एस या विषयावर तो बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. एस. एस. रुईकर होते. अध्यक्षीय भाषणात प्रा. रूईकर म्हणाले, शिक्षणातील समाजिक जाणीव निर्माण करण्याची शक्ती एन.एस.एसच्या माध्यमातून जागृत होते. माणसांच्या जीवनशैलाचा परिचय शिबिराच्या माध्यमातून जागृत होते. आरती काळे यांनी प्रास्तविक केले. प्रतिक भागाजी यांने सूत्रसंचालन व आभार माने. यावेळी प्रा. जी. जे. नवाथे, प्रा. डॉ. दीपक तुपे, प्रा. वाय.डी. हरताळे, प्रा. संदीप पाटील आदी उपस्थित होते.